हंगाम २०२५-२६ मधील किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत कडधान्ये व तेलबिया यांच्या हमीभावाने केल्या जाणाऱ्या खरेदीसाठी अनुषंगिक खर्चाचे दर निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक : सपस-२०२५/प्र.क्र.२३२/२४-स
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.
दिनांक : ८ एप्रिल, २०२६

वाचा -

१) शासन निर्णय समक्रमांक दिनांक १६ मार्च, २०२६
२) राज्यप्रमुख, नाफेड, मुंबई यांचा दुरध्वनी संदेश.

प्रस्तावना :-

राज्यात किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत कडधान्य व तेलबियांची हमीभावाने खरेदी नाफेड व एनसीसीएफ यांच्या वतीने स्टेट नोडल एजन्सीकडून केली जाते. हमीभावाने खरेदीसाठी स्टेट नोडल एजन्सी व सब एजन्ट संस्थांना अनुषंगिक खर्च अनुज्ञेय आहे.

प्रत्येक जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समिती, इतर सुनिश्चित केलेल्या खरेदी केंद्रांमध्ये हमाली, तोलाई व अन्य अनुषंगिक खर्चाचे दर वेगवेगळे असल्याने, सदर अनुषंगिक खर्च राज्यात समान असण्यासाठी उपनिर्दिष्ट १ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला होता. सदर शासन निर्णयामध्ये प्रशासकीय कारणास्तव सुधारणा करणे आवश्यक असल्याने सदर अनुषंगिक खर्चासाठी सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

उपनिर्दिष्ट १ मधील समक्रमांकाचा दिनांक १६ मार्च, २०२६ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येत आहे.

०२. खरीप हंगाम २०२५-२६ करिता किमान आधारभूत योजनेंतर्गत नाफेडच्या वतीने हमी भावाने खरेदी करताना येणाऱ्या खालील नमूद अनुषंगिक खर्चासाठी रु. ५५.०० प्रति क्विंटल दर लागू करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अनुषंगिक खर्चाच्या बाबी :-

| No. | Particulars | Rs. |
|---|---|---|
| 1 | Marking on bag, cost of Sutli & QR Code | 8.00 |
| 2 | Labour charges for shifting from weightment scale & stitching | 9.00 |
| 3 | Loading to truck from APMC (including warai) | 15.00 |
| 4 | Unloading & Stacking at MSWC/CWC | 18.00 |
| 5 | Internal Transportation | 3.00 |
| 6 | Thappi | 2.00 |
| | **Total** | **55.00** |

उपरोक्त नमूद अनुषंगिक खर्चाचे दर हंगाम २०२५-२६ साठी लागू राहतील. सदर खर्च केंद्र शासनाच्या नोडल संस्था नाफेड/एनसीसीएफ यांनी वेळोवेळी संबंधितांना अदा करण्यात यावी.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०४०८११३५११३२०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by ANIROODHA SURYAKANT DESHPANDE
Date: 2026.04.08 11:37:08 +05'30'

**(अनिरुध्द सू. देशपांडे)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई
४. राज्यप्रमुख, नाफेड, मुंबई
५. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
७. कार्यकारी संचालक, विदर्भ सहकारी पणन महासंघ, नागपूर
८. व्यवस्थापक, एनसीसीएफ, मुंबई
९. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (पणन मंडळामार्फत)
१०.सर्व सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (पणन मंडळामार्फत)